मनोरंजनासह प्रबोधनासाठी... दैनिक epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी


संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ३१२ वा • बुधवार, ता. २१ मे २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००

## महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज

**मुंबई । प्रतिनिधी**

अरबी समुद्रात कर्नाटक किनारपट्टीजवळ २२ मे रोजी कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) वर्तवली आहे. हे क्षेत्र उत्तरेकडे सरकताना त्याची तीव्रता वाढत जाण्याचा अंदाज आहे. या क्षेत्रापासून चक्रीवादळाची निर्मिती होणार की नाही याबाबत अद्याप स्पष्टता नसली तरी, या क्षेत्राच्या प्रभावामुळे पुढील पाच दिवस कोकण आणि मध्य महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज आहे. कमी दाबाच्या क्षेत्राच्या अपडेट सोबतच पुढील दहा दिवसांमध्ये




मॉन्सूनची वाटचाल कशी राहील, राज्यातले हवामान कसे राहील यासाठी संशोधनकडून माहिती घेत रहावी, असे मयुरेश प्रभुणे यांनी सांगितले.

## सरन्यायाधीश गवई यांचा अवमान आंबेडकरी विचारधारेमुळे केला का?

### प्रोटोकॉल उल्लंघनावरून पटोले यांचा सवाल

**मुंबई । प्रतिनिधी**

भारतातील सर्वोच्च न्यायालयाचे नवनियुक्त सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या महाराष्ट्र दौऱ्यात राज्य सरकार व प्रशासनाने आवश्यक असलेला प्रोटोकॉल पाळलेला नाही, असे समोर आला आहे. या दुर्लक्षामुळे न्यायसंस्थेच्या सर्वोच्चपदावर विराजमान असलेल्या व्यक्तीच्या प्रतिष्ठेवर आघात झाला आहे, असा सवाल महाराष्ट्र विधानसभेचे माजी अध्यक्ष व काँग्रेस नेते नाना पटोले यांनी उपस्थित केला. सरन्यायाधीश गवई हे स्वतः आंबेडकरी विचारधारेचे असलेले पहिले न्यायाधीश आहेत. त्यांच्या स्वागतात झालेल्या अनास्थेमुळे सामाजिक स्तरावर संताप व्यक्त होत असून, यामागे जातिवादी मानसिकता कार्यरत असल्याचा संशय निर्माण झाला आहे. गवईंचा थेट संताप : आपल्या दौऱ्यात सरन्यायाधीशांनी भाषणातून राज्य सरकार व प्रशासकीय अधिकाऱ्यांची कार्यपद्धती उघडपणे टीकास्त्रांनी वेधली. त्यांनी सांगितले की, इतक्या उच्चपदावर असूनही, प्रोटोकॉलचा अभाव म्हणजे केवळ व्यक्तिविशेषाचा नव्हे, तर संपूर्ण भारतीय संविधानाचा अपमान आहे.



नाना पटोलेंची राष्ट्रपतींकडे मागणी : या घटनेच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते नाना पटोले यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूंना पत्र लिहून, प्रोटोकॉल न पाळणाऱ्या अधिकाऱ्यांवर त्वरित आणि कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. ''भारतीय न्यायसंस्थेच्या सर्वोच्च प्रतिनिधीचा असा अपमान सहन केला जाऊ शकत नाही,'' असे त्यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे. याप्रकरणी प्रशासनाने अद्याप अधिकृत खुलासा केलेला नाही. मात्र, या घटनेमुळे महाराष्ट्रातील राजकीय व सामाजिक वर्तुळात खळबळ माजली आहे.



## कोकणातील पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याच्या प्रकल्पाचा आढावा

### विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात उच्चस्तरीय बैठक

**मुंबई । प्रतिनिधी**

कोकणातील जलस्रोतांचा उपयोग वाढवण्यासाठी तसेच दुष्काळग्रस्त भागाला पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टिकोनातून, कोकणातील पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याच्या महत्वाकांक्षी प्रकल्पाचा आढावा घेण्यासाठी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात एक उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीत त्यांनी स्पष्ट निर्देश दिले की, प्रकल्पाच्या सर्वेक्षणाची कामे निविदेत दिलेल्या कालमर्यादेत पूर्ण करावीत. महाराष्ट्र प्रतिसाद क्षमता विकास प्रकल्प (MRDP) अंतर्गत, या योजनेला जागतिक बँकेचे अर्थसहाय्य मिळणार आहे, आणि त्यामुळे याची अंमलबजावणी अधिक प्रभावी आणि वेळेत होणे अपेक्षित आहे. महत्त्वाचे मुद्दे : पाणी वळविण्याचा प्रकल्प गोदावरी खोऱ्यातील पाणी टंचाई सोडवण्यासाठी महत्त्वपूर्ण. प्रकल्पातील मदत व पुनर्वसन विभागातून कृष्णा खोरे विकास महामंडळाकडे प्रकल्प हस्तांतरणाचा निर्णय. पवना धरण परिसरातील पर्यटन विकास या बैठकीच्या अजेंड्यातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा होता. उपस्थित मान्यवर : मुख्यमंत्री यांचे मुख्य आर्थिक सल्लागार आणि मित्रा चे CEO प्रवीण परदेशी. जलसंपदा विभागाचे सचिव संजय बेलसरे. आपत्ती व्यवस्थापन विभागाचे संचालक सतीशकुमार खडके. कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले. गोदावरी खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक संतोष तिरमनवार कोकणातील पाणी गोदावरीत वळविण्याचा हेतू : सिंचन वाढवणे. पिण्याच्या पाण्याचा पुरवठा. दुष्काळग्रस्त भागातील जलसमस्यांचे समाधान.

## जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे म्हणतात, ७० ते ८०% शेतकरी आत्महत्या बोगस

### किसान सभेने केला निषेध

**परभणी । प्रतिनिधी**



> **जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांची आत्महत्या संदर्भातील विधाने संपूर्ण शेतकरी समुदायाचा अवमान करणारी आहेत. आत्महत्या करणाऱ्या कुटुंबीयांवर शंका घेणे ही अमानवीय बाब असून, राज्याच्या संवेदनशील प्रशासनाची ही भूमिका असू शकत नाही.**
> **ॲड. माधुरी क्षिरसागर**

परभणी जिल्ह्यातील शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने आज जिल्हाधिकारी यांना पीकविमा, कर्जमुक्ती व शेतकऱ्यांच्या इतर प्रश्नांबाबत निवेदन देण्यात आले. मात्र, या निवेदनावर प्रतिक्रिया देताना जिल्हाधिकारी यांनी व्यक्त केलेली मते प्रशासनाच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरली आहेत. शेतकरी झुंडशाही करतात : प्रशासनाची गंभीर टिप्पणी शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींना उत्तर देताना जिल्हाधिकारी म्हणाले की, ''शेतकरी झुंडशाही करतात, विमा कंपनीच्या कर्मचाऱ्यांवर दादागिरी करतात.'' शेतकऱ्यांचा प्रश्न उपस्थित करणाऱ्या एका प्रतिनिधीने विचारले, ''जर काही शेतकरी चुकीचे वर्तन करत असतील तर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यास प्रशासनास कोण रोखतो आहे?'' ''७०८०% शेतकरी आत्महत्या बोगस?'' शेतकरी आत्महत्येच्या प्रश्नावर जिल्हाधिकारी म्हणाले की, ''७०८०% आत्महत्या बोगस असतात, तरी आम्ही त्यांना अनुदान देतो.'' या विधानामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येसारख्या संवेदनशील विषयाबाबत प्रशासकीय विचार किती वरवरचा आहे हे स्पष्ट होते, अशी प्रतिक्रिया किसान सभेच्या ॲड. माधुरी क्षीरसागर यांनी दिली. विमा कंपन्यांचा अकार्यक्षम कारभार आणि प्रशासनाची भूमिका जिल्ह्यात ७ लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी पीक विमा भरला आहे. परंतु विमा कंपनीकडे तक्रारींचे निवारण करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळच नव्हते. शेतकऱ्यांनी नैसर्गिक आपत्तीनंतर ऑनलाईन तक्रार करण्याचा प्रयत्न केला, परंतु तंत्रसुविधा अपुरी होती. यासंदर्भात २६ जून २०२३ च्या शासन निर्णयामध्ये स्पष्ट आदेश असूनसुद्धा जिल्हा प्रशासनाने संबंधित विमा कंपनीवर कारवाई करण्याऐवजी जबाबदारी झटकली, अशी टीका करण्यात आली. शेतकऱ्यांना 'हुषार' म्हणत प्रशासन मोकळे. शेतकऱ्यांना विमा योजनांची माहिती का दिली जात नाही, असा सवाल केला असता जिल्हाधिकारी म्हणाले, ''परभणीचे शेतकरी खूप हुशार आहेत, त्यांना सर्व माहिती आहे.'' हा दृष्टिकोन वास्तवाला फारसा धरून नाही. कारण शासन निर्णय समजून घेण्यासाठी उच्च शिक्षित व्यक्तींसाठीही अडचणी निर्माण होतात. झुंडशाही नेमकी कोण करतंय? संघटनेकडून असा आरोप करण्यात आला की, ''खरंतर प्रशासनच सत्ताधाऱ्यांच्या झुंडशाहीपुढे झुकलेलं आहे आणि सामान्य शेतकरी न्यायापासून दूर आहे.' बैठकीतील मुद्द्यांना बगल देण्याचे धोरण? ता.७ मे २०२५रोजी झालेल्या अधिकृत बैठकीत कॉ. शिवाजी कदम व ॲड. माधुरी क्षीरसागर यांनी बोगस विमा प्रकरणी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली होती. मात्र, बैठकीच्या प्रोसिडिंगमध्ये या मुद्द्यांचा उल्लेखच नाही, अशी माहिती देण्यात आली. विम्याची योजना उपकार नव्हे, अधिकाराची मागणी : शेतकरी संघर्ष समितीने स्पष्ट सांगितले की, ''शेतकऱ्यांना उपकार नकोत, योजनांची पारदर्शक अंमलबजावणी हवी आहे.'' शेतकऱ्यांच्या अनुभवानुसार विमा कंपनी व कृषी विभागाच्या काही अधिकाऱ्यांचा वर्तन अतिशय पक्षपाती व अपारदर्शक आहे. ''आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांविषयी तिरस्कार समाजाचा निषेध.

## मुख्याधिकारी घोलप यांची चौकशी; अतिक्रमण मोहीमेमागे आर्थिक उलाढाल?

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

अतिक्रमण काढण्याच्या नावाखाली मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांनी सर्वसामान्य गोरगरीब हातावर पोट भरणाऱ्या सर्वसामान्य जनतेची थट्टा केली आहे. सर्वसामान्यांचे संसार उध्वस्त करीत घोलप यांनी त्यांना रस्त्यावर आणले. अतिक्रमण काढताना दूजाभाव केला. मुख्याधिकारी घोलप यांची जिल्हाधिकारी यांनी सखोल निःपक्ष पणाने चौकशी करत त्यांना बडतर्फ करावे, अशी मागणी शेकडो नागरिकांनी केली आहे. पालिकेने काही महिन्या पूर्वी पोलीस बंदोबस्त घेऊन ठराविक अतिक्रमण काढले. रस्ते अतिक्रमण मुक्त , पिण्याचे पाईपलाईन, गटाराची कामे तातडीने सुरू केली जातील, त्याचबरोबर विजेची खांबे मागे घेऊन या ठिकाणी रस्ते केले जातील. अतिक्रमणे काढली त्या ठिकाणी पुन्हा अतिक्रमण झाले तर त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचा इशारा पालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिला. अतिक्रमण काढलेल्यांना विजेचे नवीन कनेक्शन घेण्यासाठी पालिकेने ना हरकत पत्रही दिले. पोकळ भीमगर्जना केलेल्या अधिकाऱ्यांच्या फसव्या मोहिमेला मोठी प्रसिद्धीही मिळाली. कुठे माशी शिंकली आणि आठ दिवसानंतर गुंडाळलेली अतिक्रमण मोहीम आज पर्यंत गुंडाळलेलीच आहे. अतिक्रमण ठिकाणी मोठा कचरा घाण, डबर, माती, विटा फरशी तुकडे पडलेले आहेत.



रामनवमीनंतर पुन्हा अतिक्रमणे पूर्ववत होऊ लागली. संगमनेर - नेवासा रस्त्यावरील परिस्थीती या पेक्षा वेगळी नाही. मुख्य रस्त्यावरील काही अतिक्रमणे हटवली पण गटारी व पाण्याची पाईपलाईन अद्यापही केली नाही. विजेचे पोल हलविण्यात आले नाही. न्यायालयाच्या आदेशाने मेन रोडवरील बहुचर्चित एक अतिक्रमणे हटवले परंतु दोन दिवसांनी या ठिकाणी बिल्डरने भर रस्त्यात अतिक्रमण करून पत्र्याचे कंपाऊंड ठोकले. नागरिकांनी त्याबाबत तक्रारी करूनही हे अतिक्रमण कायम आहे. बस स्थानकाजवळील अतिक्रमणे आता पक्क्या स्वरूपात उभे होत आहे. याकडे नगर पालिका व पोलीसांनी दुर्लक्ष केले आहे. अतिक्रमण मोहीम थांबविण्यामागे मोठी आर्थिक उलाढाल झाल्याची चर्चा शहरात सुरू आहे. अतिक्रमण मोहीम म्हणजे नगर पालिकेच्या अधिकाऱ्यांना सोन्याचे अंडे मिळाल्याची चर्चा आहे. जिल्हाधिकारी यांनी याबाबत चौकशी करावी, तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांना नागरिक भेटून घोलप यांची कैफियत मांडणार आहेत.

## फळांवर कृत्रिम रंगांचा वापर रोखण्यासाठी तपासणी आणि विशेष मोहीम

**मुंबई । प्रतिनिधी**




भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने (एफएसएसएआय) सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना अवैधपणे फळांवर कृत्रिम रंगांचा वापर रोखण्यासाठी तपासणी आणि विशेष मोहीम राबवण्याचे आवाहन केले आहे. यासह फळांच्या कृत्रिम पिकवण्यासाठी कॅल्शियम कार्बाइडच्या वापरावर बंदी आणून ग्राहकांच्या आरोग्याचे होणारे नुकसान थांबवून सकारात्मक पाऊल उचलले आहे. सर्व राज्य, केंद्रशासित प्रदेशांच्या अन्न सुरक्षा आयुक्त आणि 'एफएसएसएआय'च्या प्रादेशिक संचालकांना फळांच्या बाजारपेठा आणि मंडईंवर कडक लक्ष ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहे, जेणेकरून कॅल्शियम कार्बाइडसारख्या (ज्याला सामान्यतः मसाला म्हणतात) पिकवणाऱ्या एजंट्सचा अवैध वापर रोखता येईल. या मोहिमेचा भाग म्हणून, ज्या ठिकाणी फळांची साठवणूक केली जाते तिथे जर कॅल्शियम कार्बाइडचा वापर आढळला तर त्याला परिस्थितीजन्य पुरावा मानून अन्न व्यवसाय ऑपरेटर (एफबीओ) वर खाद्य सुरक्षा आणि मानके (एफएसएस) कायदा, २००६ अंतर्गत कारवाई केली जाणार आहे.

## ऐतिहासिक विजय! 'असेन मी.. नसेन मी...' नाटकाला ७.५० लाखांचे प्रथम पारितोषिक

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

सांस्कृतिककार्यसंचालनालयाच्या वतीने आयोजित ३५ व्या महाराष्ट्र राज्य मराठी व्यावसायिक नाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्क्रिप्टीज क्रिएशन्स प्रस्तुत 'असेन मी.. नसेन मी...' या नाटकाने ७ लाख ५० हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक पटकावून गौरव प्राप्त केला आहे. ही घोषणा संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केली. मुख्य पारितोषिक विजेते नाटके: प्रथम पारितोषिक (₹७.५० लाख): असेन मी.. नसेन मी... संस्था: स्क्रिप्टीज क्रिएशन्स द्वितीय पारितोषिक (₹४.५० लाख): वरवरचे वधुवर संस्था: कलाकारखाना आणि शांताई तृतीय पारितोषिक (₹ ३ लाख): उर्मिलायन संस्था: सुमुख चित्र इतर पारितोषिके: दिग्दर्शन: प्रथम (₹१,५०,०००): अमृता सुभाष (असेन मी.. नसेन मी...) द्वितीय (₹१,००,०००): अद्वैत दादरकर (शिकायला गेलो एक) तृतीय (₹५०,०००): विराजस कुलकर्णी (वरवरचे वधुवर) नाट्यलेखन: प्रथम (₹१,००,०००): संदेश कुलकर्णी (असेन मी.. नसेन मी...) द्वितीय (₹६०,०००): शेखर ढवळीकर (नकळत सारे घडले) तृतीय (₹४०,०००): सुनिल हरिश्चंद्र व स्मिता दातार (उर्मिलायन) प्रकाश योजना: प्रथम (₹४०,०००): प्रदीप मुळ्ये (गोष्ट संयुक्त मानापमानाची) द्वितीय (₹३०,०००): शितल तळपदे (मास्टर माईंड) तृतीय (₹२०,०००): चेतन ढवळे (उर्मिलायन) नेपथ्य: प्रथम (₹४०,०००): प्रदीप मुळ्ये (असेन मी.. नसेन मी...) द्वितीय (₹३०,०००): प्रदीप पाटील (वरवरचे वधुवर) तृतीय (₹२०,०००): संदेश बेंद्रे (ज्याची त्याची लव्हस्टोरी) संगीत दिग्दर्शन: प्रथम (₹४०,०००): निषाद गोलांबरे (वरवरचे वधुवर) द्वितीय (₹३०,०००): निनाद म्हैसाळकर (उर्मिलायन) तृतीय (₹२०,,०००): साकेत कानिटकर (असेन मी.. नसेन मी...) वेशभूषा: प्रथम (₹४०,०००): मयुरा रानडे (गोष्ट संयुक्त मानापमानाची) द्वितीय (₹३०,०००): मंगल केंकरे (सूर्याची पिल्ले) तृतीय (₹२०,०००): सुनिल हरिश्चंद्र (उर्मिलायन) रंगभूषा: प्रथम (₹४०,०००): उदयराज तांगडी (उर्मिलायन) द्वितीय (₹३०,०००): राजेश परब (गोष्ट संयुक्त मानापमानाची) तृतीय (₹२०,०००): सुरेंद्र चव्हाण व कौशल तांबे (असेन मी.. नसेन मी...) उत्कृष्ट अभिनयासाठी रौप्यपदक व ₹५०,०००/-: पुरुष कलाकार: प्रशांत दामले (शिकायला गेलो एक) ऋषिकेश शेलार (शिकायला गेलो एक) आनंद इंगळे (नकळत सारे घडले) सुव्रत जोशी (वरवरचे वधुवर) ओंकार राऊत (थेट तुमच्या घरातून) स्त्री कलाकार: निना कुलकर्णी (असेन मी.. नसेन मी...) शुभांगी गोखले (असेन मी.. नसेन मी...) निहारिका राजदत्त (उर्मिलायन) सखी गोखले (वरवरचे वधुवर) शर्मिला शिंदे (ज्याची त्याची लव्हस्टोरी) दि. ६ ते १६ मे २०२५ दरम्यान छत्रपती शिवाजी नाट्यमंदिर, दादर (प.) येथे पार पडलेल्या या स्पर्धेत एकूण १० व्यावसायिक नाटके सादर करण्यात आली. प्रेक्षकांची उदंड उपस्थिती आणि रसिकांची टाळ्यांची पावती यामुळे प्रत्येक प्रयोग गगनभेदी जल्लोषात रंगला. परीक्षक म्हणून विजय गोखले, संजय डहाळे, मिलिंद शिंदे, आशा शेलार आणि लिना भागवत यांनी जबाबदारी पार पाडली.


सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी विजेत्या सर्व कलाकारांचे अभिनंदन केले. सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी विजेते नाट्यनिर्माते, दिग्दर्शक, लेखक व सर्व सन्मानित कलावंतांचे मनःपूर्वक अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. ह्या स्पर्धेसाठी समन्वयक म्हणून राकेश तळगावकर यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. या स्पर्धेतील यशस्वी कलावंतांनी पुन्हा एकदा मराठी रंगभूमीचा लौकिक उंचावला आहे. भविष्यातही अशीच दर्जेदार निर्मिती रसिकांना पाहायला मिळो, हीच अपेक्षा!



# स्वप्नील खामकरचा आंतरराष्ट्रीय परिषदेत संशोधन प्रबंध सादर

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा केला जागर

## लंडनमधील ऐतिहासिक ग्रेज इन येथे भारताचे केले प्रतिनिधित्व



**अहमदनगर । प्रतिनिधी**

लंडन येथील ऐतिहासिक ग्रेज इन येथे नुकत्याच पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत स्वप्नील खामकर यांनी आपला संशोधन प्रबंध सादर करत भारताचे, विशेषतः महाराष्ट्राचे प्रभावी प्रतिनिधित्व केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जागतिक दृष्टी: न्याय, समता आणि लोकशाही यांचे पुनर्विचार या विषयावर आधारित या परिषदेत त्यांनी आंबेडकर विचारधारेचा जागतिक परिषदेत अभ्यासपूर्वक मागोवा घेतला. या परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे, मुंबई विद्यापीठ आणि ग्रेज इन, यूके यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद आयोजित करण्यात आली होती. डॉ. आंबेडकर यांच्या लंडनमधील शिक्षण प्रवासाचे स्मरण करत, त्यांच्या विचारांचा जागतिक प्रभाव अधोरेखित करण्याच्या दृष्टिकोनातून ही परिषद अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली. परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी केंद्रीय राज्य मंत्री, माहिती आणि प्रसारण व संसदीय कार्य मंत्रालयाचे डॉ. एल. मुरुगन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागचे (महाराष्ट्र शासन) संजय शिरसाट, मुख्य सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागचे हर्षदीप कांबळे (आयएस), माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे, बार्टीचे महासंचालक सुनील वारे, अण्णा भाऊ साठे अभ्यास केंद्र, मुंबई विद्यापीठचे संचालक प्रा. डॉ. बळीराम गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. भारतासह अनेक देशांतील शास्त्रज्ञ, धोरणतज्ज्ञ, कायदेपंडित, अभ्यासक आणि संशोधक यांचा परिषदेतील सहभाग लक्षणीय ठरला. परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी केंद्रीय राज्य मंत्री डॉ. एल. मुरुगन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे अधिकारी संजय शिरसाट व हर्षदीप कांबळे (आयएएस), माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे, बार्टीचे महासंचालक सुनील वारे, प्रा. डॉ. बळीराम गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. भारतासह अनेक देशांतील शास्त्रज्ञ, धोरणतज्ज्ञ, कायदेपंडित, अभ्यासक आणि संशोधक यांचा परिषदेतील सहभाग लक्षणीय ठरला. स्वप्नील खामकर यांनी सादर केलेल्या संशोधन प्रबंधात डॉ. आंबेडकर यांचे सामाजिक न्याय, कायदा आणि समता या विषयांवरील विचारांचा आजच्या जागतिक संदर्भात उपयोग कसा होऊ शकतो, यावर स्पष्ट आणि अभ्यासपूर्ण मांडणी केली. आंबेडकर विचारधारेचा आधुनिक विकास, युवापिढीवरचा प्रभाव आणि समाजपरिवर्तनासाठीची उपयुक्तता यांचा त्यांनी अभ्यासपूर्ण आढावा घेतला. त्यांच्या सादरीकरणाला उपस्थित विद्वान आणि मान्यवरांकडून विशेष दाद मिळाली. स्वत:चा अनुभव सांगताना स्वप्नील खामकर म्हणाले, डॉ. आंबेडकर यांचे विचार जागतिक मंचावर मांडणे ही माझ्यासाठी केवळ वैयक्तिक अभिमानाची बाब नाही, तर ती एक सामाजिक जबाबदारी आहे. त्यांच्या विचारांतूनच नव्या पिढीला नवसंजीवनी मिळू शकते, असे त्यांनी सांगितले. या परिषदेतील विविध सत्रांमध्ये डॉ. आंबेडकर यांचे लंडनमधील शिक्षण, ग्रेज इन मधील कायद्याचा अभ्यास, लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधील अर्थशास्त्राचे विचार, आणि रुपयाचा प्रश्न या त्यांच्या प्रबंधाचा जागतिक अर्थव्यवस्थेवर झालेला प्रभाव यावर सखोल चर्चा झाली. परिषदेत सहभागी प्रतिनिधींना डॉ. बाबासाहेब आंबेडकर हाऊस, लंडन येथे भेट देण्याची संधी मिळाली. या भेटीदरम्यान शिष्टमंडळाने त्यांच्या जीवनप्रवासातील महत्त्वपूर्ण टप्प्यांचा अनुभव घेतला. स्वप्नील खामकर यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल आमदार संग्राम जगताप, माजी आमदार सिताराम घनदाट, आणि चर्मकार विकास संघाचे प्रदेशाध्यक्ष संजय खामकर यांनी त्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



# पीएफ पावत्यांसाठी शिक्षक परिषदेचा पाठपुरावा विशेष कॅम्पद्वारे पावत्या वितरणाची मागणी

## तर आक्रमक आंदोलनाचा पवित्रा- बोडखे

**अहमदनगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी (पीएफ) संदर्भातील पावत्या मार्च २०२४ अखेरपर्यंत अद्याप उपलब्ध न झाल्याने महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

सदर पावत्या तात्काळ ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने देण्यात याव्यात, यासाठी विशेष कॅम्प आयोजित करण्याची मागणी परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीसाठी शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने माध्यमिक शिक्षण विभागाच्या वेतन पथक अधीक्षक रामदास म्हस्के यांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी कोषाध्यक्ष प्रसाद सामलेटी, प्राचार्य संभाजी पवार, एस.एल. शिरसाठ, सुदाम दळवी, अभिजीत गवारे, बाळू दुधाडे, सुजय सजलानी, बापू दुधाडे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. वेतन पथक अधीक्षक रामदास म्हस्के यांनी या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देत लवकरच उपाययोजना करण्यात येतील, असे आश्वासन दिले.

मात्र, जर अद्यापही तोडगा निघाला नाही, तर शिक्षक परिषद आंदोलनाचा आक्रमक पवित्रा घेइल, असा इशारा यावेळी देण्यात आला. जिल्ह्यातील शाळांना २०२१-२०२२ पर्यंतच्या भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या प्राप्त झाल्या आहेत. तसेच कर्मचाऱ्यांचे पीएफ खाते विशेष कॅम्पच्या माध्यमातून ऑनलाईन अपडेटही करण्यात आले आहे. मात्र, त्यानंतर आजतागायत कुठल्याही कर्मचाऱ्याला पुढील पावत्या मिळालेल्या नाहीत. त्यामुळे कर्मचारी आपल्या पीएफ खात्यातून कर्ज काढू इच्छित असताना, केवळ २०२१-२२ पर्यंतच शिल्लक रकमेवर आधारित कर्ज मंजूर केले जात आहे.

परिणामी, पुढील दोन वर्षांचा हिशोब न धरल्याने कर्मचारी आर्थिकदृष्ट्या अडचणीत सापडले आहेत. फक्त पावत्याच नव्हे तर, जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रकारच्या पुरवणी देयकांचा, वैद्यकीय खर्चाच्या देयकांचा तसेच सेवानिवृत्त मुख्याध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या रजारोखीरकरणाच्या देयकांचा विलंबाच्या प्रश्नावर शिक्षक परिषदेने लक्ष वेधले. ही सर्व देयके तातडीने वितरित करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.

# गुरुवारी ७० ते ९० च्या दशकातील सुरेल गीतांची महफिल

**अहमदनगर । आबीद खान**

ॲड. अमीन धाराणी प्रस्तुत गाता रहे मेरा दिल व स्वरछंद ग्रुपच्या वतीने ७० ते ९० च्या दशकातील सुमधुर गीतांची महफीलचे गुरुवार ता. २२ मे २०२५ रोजी संध्याकाळी ६ वाजता सावेडी येथील माऊली सभागृहात आयोजन करण्यात आले असल्याचे ॲड. अमीन धारणी यांनी सांगितले. या महफीलीत संजय भिंगारदिवे,ॲड. गुलशन धाराणी, राजकुमार सहदेव, दीपा भालेराव, हेमंत नरसाळे, डॉ. सुरेखा घोडके, चंदर ललवाणी, ज्योती भिंगारदिवे, अर्जुन चौरे, मंदाकिनी पाडगावकर, वंदना जंगम, सोनवणे जी, नीता गडाख, मोनाली बोरुडे, माधुरी सोनटक्के, अंतरकर काका हे गीते सादर करतील तर सुरवातीला अमीत बरवा हे सेक्सोफोन



वर गीत सादर करणार आहे. सुत्रसंचालन विजय माळी व दिपा माळी करणार आहे. सिस्टीम व तांत्रिक सहाय व्यवस्था विजु भोसले व अभिजित कोल्हार यांचे असल्याचे राजकुमार गुरनानी यांनी सांगितले. या कार्यक्रमात शहरातील काही सामाजिक कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान केला जाणार आहे. कार्यक्रमाच्या अगादर रिफ्रेशमेंटची व्यवस्था करण्यात आली आहे. कार्यक्रमासाठी नागेबाबा मल्टीस्टेट, साहील वे ब्रिज, डीसीबी बँक, एकझारकी, सेलिंग किचन, विश्व एक्का आदींचे सहकार्य लाभले आहे. सर्वांना मोफत प्रवेश असून कार्यक्रम वेळ सुरू होईल. तरी रसिकांनी वेळेवर उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घ्यावा असे आवाहन संध्या मेढे यांनी केले .

# वाहतूक शिस्त,आपत्ती व्यवस्थापनाचे धडे; प्रशिक्षणाचा प्रारंभ

## वाहतूक सुरक्षा ते प्रथोमोपचार दिले जाणार धडे

**अहमदनगर । प्रतिनिधी**

सद्यस्थितीत वाढत्या रस्ते अपघातांची गंभीरता लक्षात घेता, विद्यार्थ्यांच्या मनात वाहतुकीच्या शिस्तीची रुजवण आणि आपत्कालीन प्रसंगी स्वसंरक्षणाचे भान निर्माण व्हावे, यासाठी बुधवार ता. २१ मे रोजी पासून आरएसपी (रस्ता सुरक्षा पथक) अधिकारी निवासी प्रशिक्षण कार्यशाळेला प्रारंभ होणार आहे.

हे निवासी प्रशिक्षण ३० मे पर्यंत चालणार असून, शिक्षकांसाठी १० दिवसांचे विभागस्तरीय प्रशिक्षण यामध्ये घेतले जात आहे. या प्रशिक्षणाचा उद्देश विद्यार्थ्यांना त्यांच्या शालेय जीवनातच वाहतुकीचे नियम, ट्राफिक सेन्स, स्वसंरक्षणाबरोबरच नागरी संरक्षण, पदकवायत, अग्निशमन, आपत्ती व्यवस्थापन व प्रथोमोपचार यासारख्या अत्यावश्यक विषयांबाबत सुसज्ज व जागरूक करणे हा आहे.

महाराष्ट्र राज्य शासनाच्या शिक्षण व गृह (पोलीस) विभागाच्या अंतर्गत, महाराष्ट्र राज्य वाहतूक सुरक्षा दल व नागरी संरक्षण संघटना-नागपूर व नाशिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हे प्रशिक्षण अहिल्यानगर शहरातील पोलीस मुख्यालयात आयोजित करण्यात आले आहे.

हे प्रशिक्षण जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे व माध्यमिक शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांच्या नियंत्रणा खाली पार पडणार आहे. प्रशिक्षणाचे नियोजन महाराष्ट्र राज्य आरएसपी ॲण्ड सीडी, नाशिक विभागाचे प्रशिक्षण प्रमुख सिकंदर अ. शेख, राखीव पोलीस निरीक्षक उमेश परदेशी व वाहतूक नियंत्रण शाखेचे निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राज्याध्यक्ष संजय शेंडे, उपाध्यक्ष पितांबर महाजन, प्रशिक्षणाधिकारी सोमनाथ बोंतले, तज्ञ सल्लागार लेखाधिकारी मनोज शिंदे, कार्याध्यक्ष विजयकुमार पोकळे, तसेच प्रकाश मिंड, एकनाथ लगड, राज धस, तुकाराम हरळ, भारत धाडगे, अनुराधा माने व जिल्हा कार्यकारिणी सदस्य हे सर्वजण परिश्रम घेत आहेत. हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, सुरक्षा, जबाबदारी आणि आपत्ती व्यवस्थापनाचे भान निर्माण करून त्यांना सजग व जबाबदार नागरिक घडवण्यासाठी निश्चितच मोलाची भूमिका बजावणार आहे.



# विद्यार्थ्यांसाठी ‘मार्गदर्शन केंद्र’ सुरु

## केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबत अहमदनगर महाविद्यालयाचा उपक्रम

**अहमदनगर । प्रतिनिधी**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून इयत्ता अकरावीच्या प्रवेशाकरिता सुरू झालेल्या केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमुळे अनेक विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. फॉर्म भरताना, लॉगिन आयडी तयार करताना, आवश्यक कागदपत्रे अपलोड करताना अनेक अडचणी येत असल्याने विद्यार्थ्यांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. ही गरज ओळखून अहमदनगर महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन व मार्गदर्शन केंद्र स्थापन करण्यात आले आहे. या केंद्राचे उद्घाटन नुकतेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. नोएल पारगे यांच्या हस्ते संपन्न झाले. महाराष्ट्र शासनाची ही प्रवेश प्रक्रिया स्तुत्य असून तिचा उद्देश पारदर्शकता व सुलभता आहे. मात्र, विद्यार्थ्यांना आणि पालकांना या प्रक्रियेची संपूर्ण माहिती नसल्याने त्यांना समजूतदारपणे मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. त्यामुळेच अहमदनगर महाविद्यालयाने हे केंद्र सुरू केले असून विद्यार्थ्यांसाठी मोफत रजिस्ट्रेशन सेवा उपलब्ध करून दिली आहे, असे प्राचार्य डॉ. पारगे यांनी आपल्या भाषणात सांगितले. यावेळी उपप्राचार्य प्रा. प्रतुल कसोटे यांनी केंद्रीय प्रवेश प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती दिली. प्रा. जयंत घुमरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर प्रा. स्वामी यांनी शाखा निवडीविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी पर्यवेक्षिका उज्वला गायकवाड यांनी उपस्थितांचे आभार मानले. उपप्राचार्य प्रा. दिलीप भालसिंग, डॉ. सय्यद रजाक, सर्व ज्युनिअर कॉलेज शिक्षक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल

आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

**भाड्याने देणे**

परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.

- संपर्क -

८८८८३४७४११

निसार Art

सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट

7020356335 | 9860830016

पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.



मे. रुपाली एजन्सी

फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स

राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.

(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०

ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!

कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द

जगदंबा टी सेंटर

चहा, कॉफी, लेमन टी

शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर

शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर

प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे

97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)



# ५ जून पर्यावरणदिनी पर्यावरण परिषद

## आत्मनिर्धार फाउंडेशनचा पुढाकार

अहमदनगर । प्रतिनिधी

सातत्याने होणारी तापमान वाढ, प्रदूषण, वातावरणातील बदलामुळे पर्जन्यमान चक्र विस्कळीत झाल्याने निर्माण होणारी अस्मानी संकटे यासह येत्या काळात मानव समुदायावर ओढवणाऱ्या पर्यावरणीय समस्यांवर चर्चा आणि त्यावर उपाययोजना करण्यासाठी तालुक्यातील पर्यावरणप्रेमी मंडळींनी पुढाकार घेत पर्यावरण परिषदेचे आयोजन केल.

५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिवस म्हणून जगभर साजरा केला जातो. याचे औचित्य साधून आत्मनिर्धार फाऊंडेशन संचलित पर्यावरण संवर्धन समितीच्या माध्यमातून इसळक येथील लिंगतीर्थ येथे पर्यावरण परिषदेचे आयोजन करण्यात येणार आहे, अशी माहिती समितीचे अध्यक्ष भानुदास कोतकर यांनी दिली. शेंडी-पिंपळगाव माळवी परिसरातील टेंभी डोंगरावर पर्यावरणप्रेमी मंडळींनी रविवारी ता. १८ मे रोजी सकाळी मॉर्निंग वॉक केला. यावेळी शरद कराळे व सुदाम लांडगे यांनी टेंभी डोंगरावरील वटवृक्ष संवर्धन चळवळीची उपस्थितांना माहिती दिली. दरम्यान, सर्व सदस्यांनी पहिल्या पर्यावरण परिषदेची नियोजनपूर्व बैठक घेतली. कार्यक्रमाची रूपरेषा निश्चित करण्यात आली. बैठकीसाठी सुनील जाजगे, रामदास कोतकर, पत्रकार संदीप बांगर, ज्ञानेश्वर डहाळे, भास्कर कोतकर, सुदाम घोडके, भाऊसाहेब म्हस्के, दुर्गवेडे भ्रमंती ट्रेकिंग ग्रुपचे अंकुश लोंढे, मच्छिंद्र म्हस्के यांच्यासह पर्यावरणप्रेमी नागरिक उपस्थित होते. या उपक्रमात अधिकाधिक पर्यावरण आणि निसर्गप्रेमी मंडळींनी सहभागी व्हावे, असे आवाहन समितीचे समन्वयक अॅड. राहुल ठाणगे यांनी केले.

### धोरणात्मक निर्णय आणि कृती कार्यक्रमासाठी परिषदेचे आयोजन : महादेव गवळी

**वाढत्या पर्यावरणीय समस्या लक्षात घेता वृक्ष लागवड आणि संवर्धन चळवळ आवश्यक असून त्यासाठी पर्यावरण परिषदेचे आयोजन करण्यात येत आहे. यातील चर्चेतून काही धोरणात्मक निर्णय घेऊन त्यानुसार कृती कार्यक्रम हाती घेतले जातील, अशी माहिती आत्मनिर्धार फाउंडेशनचे अध्यक्ष महादेव गवळी यांनी दिली.**

# संजीवनी पॉलिटेक्निकच्या सोळा विद्यार्थ्यांना एल अँड टी डीफेन्स कंपनीत नोकरी



कोपरगाव । किसन पवार

दरवर्षी संजीवनी के.बी.पी. पॉलिटेक्निकच्या शेकडो पदविका अभियंत्यांना नामांकित कंपन्यांमध्ये नोकऱ्या मिळतात. चालु वर्षी देखील ही यशस्वी घौडदौड अविरतपणे चालु असुन अलिकडेच पुण्याच्या एल अँड टी डीफेन्स कंपनीने मेकॅनिकल इंजिनिअरींगच्या अंतिम वर्षातील सोळा विद्यार्थ्यांची त्यांच्या अंतिम निकाला अगोदरच नोकरीसाठी आकर्षक पगारावर निवड केली असल्याची माहिती संजीवनी पॉलिटेक्निकने दिली. एल अँड टी डीफेन्स ने निवड केलेल्या विद्यार्थ्यांमध्ये हर्षल अरूण गडाख, कृष्णा विकास कड, ओम नानासाहेब बागुल, प्रशांत गणेश टाके, ऋतुराज राजेंद्र लोखंडे, संकेत कैलास नजन, तेजस अरूण गोसावी, उबैद भट, विक्रम विजय भागवत, विवेक संपत जाधव, यश चांगदेव वाकचौरे, आकाश विजय उंडे, नंतुन कुमार, नरेश कुमार, रामेश्वर भाऊसाहेब भागवत व वैभव पंढरीनाथ चव्हाण यांचा समावेश आहे. एल अँड टी डीफेन्स ही लार्सन अँड टुब्रो या बहुराष्ट्रीय कंपनीचा भाग असुन भारतीय संरक्षण दलास संरक्षण उपकरणे आणि विविध प्रणाली पुरविणारी कंपनी आहे. संजीवनीच्या विध्यार्थ्यांना कंपनीने देश सेवेची अप्रत्यक्ष संधी दिली आहे, हे अधोरेखित होत आहे. मागील वर्षी याच कंपनीने सहा अभियत्यांची नोकरीसाठी निवड केली होती. त्यांनी प्रामाणिकपणे काम करून संजीवनी मधुन मिळालेल्या तांत्रिक ज्ञानाच्या जोरावर संजीवनीचे वेगळेपण सिध्द केले. त्यामुळे कंपनीने चालु वर्षी तब्बल सोळा विद्यार्थ्यांना चांगल्या पगाराची संधी दिली. विध्यार्थ्यांची नामांकित कंपनीमध्ये नोकरीसाठी निवड झाल्याबध्दल संजीवनीचे अध्यक्ष नितिन काल्हे यांनी समाधान व्यक्त करून सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले. तसेच कार्यकारी विश्वस्त अमित कोल्हे यांनी त्यांचा सत्कार करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी प्राचार्य ए. आर. मिरीकर, विभाग प्रमुख प्रा. जी. एन. वट्टमवार, टी अँड पी विभागाचे प्रमुख प्रा. आय. के. सय्यद व समन्वयक प्रा. एन. एस. आहेर उपस्थित होते.

# डॉ. नारळीकर खगोलशास्त्राचा आत्मा हरपला– बिपीन कोल्हे

कोपरगाव । किसन पवार



आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शास्त्रज्ञ, महाराष्ट्र भूषण, पद्मविभूषण डॉ. जयंत नारळीकर यांच्या निधनामुळे खगोलशास्त्राचा आत्मा हरपला अशा शब्दात संजीवनी उद्योग समूहाचे वतीने बिपीन कोल्हे यांनी श्रद्धांजली अर्पण केली. बिपीन कोल्हे पुढे म्हणाले की, स्व. जयंत नारळीकर यांना सर्वस्पर्शी ज्ञान होते. नाशिक येथे भरलेल्या ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते. लहान मुलांपासुन ते उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांनी अत्यंत सोप्या भाषेत विज्ञान शिकविले. शास्त्रज्ञाबरोबरच त्यांच्यात एक लेखकही दडला होता. यक्षांची देणगी या त्यांच्या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा किताबही मिळाला होता. अंधश्रध्दा निर्मुलनासाठीही त्यांनी मोठे काम केले. चार नगरातले माझे विश्व त्यांच्या या आत्मचरित्रात त्यांनी जीवनाचा सर्व उलगडा करत खगोलशास्त्राच्या गमती जमती लिहील्या आहेत. त्यांचे वडील रँग्लर विष्णु वासुदेव नारळीकर हे वाराणसी येथील बनारस हिंदू विद्यापिठाच्या गणित शाखेचे प्रमुख होते तर आई सुमती या संस्कृत शिक्षीका होत्या. आई वडीलांकडुनच त्यांना ज्ञानाचा वारसा मिळाला. टाटा मुलभुत संशोधन संस्थेचे खगोलशास्त्र प्रमुख तर आयुका पुणे संस्थेचे ते संचालक होते. स्थिर स्थिती सिध्दांतावर त्यांनी संशोधन केले. त्यांच्या निधनाने आपण विज्ञानवादी शास्त्रज्ञाला मुकलो आहोत अशा शब्दात माजी आमदार स्नेहलता कोल्हे व सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे कारखान्याचे युवा अध्यक्ष विवेक कोल्हे यांनी शोक व्यक्त केला.

# नालेसफाई की फक्त गवतसफाई?

## माजी नगरसेवक वारे यांचा प्रशासक डांगेंना सवाल

अहमदनगर । प्रतिनिधी



सध्या शहरातील विविध भागांमध्ये महानगरपालिकेच्या वतीने सुरू असलेल्या नालेसफाईच्या कामांवर माजी नगरसेवक निखिल वारे यांनी गंभीर सवाल उपस्थित केला आहे. ''ही नालेसफाई आहे की केवळ गवतसफाई?'' असा थेट सवाल करत त्यांनी महानगरपालिकेच्या कामकाजावर टीकेची झोड उठवली आहे. अनेक ठिकाणी नाल्यांत गाळ व अडथळे कायम असताना केवळ गवत कापून फोटोसेशन करण्यात येत असल्याची टीका त्यांनी केली.

.''ज्या ठिकाणी पाण्याचा निचरा होण्यास अडथळा येतो, तेथे योग्य ती सफाई होताना दिसत नाही. त्यामुळे संपूर्ण मोहिमेचा हेतूच फसतो आहे,'' असे त्यांनी स्पष्टपणे नमूद केले. या पार्श्वभूमीवर त्यांनी महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांना म्हटले आहे की, ''महानगरपालिकेने लाखो रुपयांचा खर्च करून सुरू केलेल्या या उपक्रमाचा नागरिकांना खरा लाभ मिळण्यासाठी ठोस आणि प्रभावी कार्यवाही होणे अत्यावश्यक आहे.

'नालेसफाई वरवरची गवतसफाई न राहता, खऱ्या अर्थाने अडथळे दूर करणारी ठरावी, हीच अपेक्षा आहे. अन्यथा नागरिकांना सोबत घेऊन आंदोलनाचा मार्ग अवलंब करावा लागेल,' असा इशाराही निखिल वारे यांनी दिला आहे.

नगरवासीयांनीही त्यांच्या या मतास पाठिंबा दर्शवत नालेसफाईच्या कामकाजावर नाराजी व्यक्त केली आहे. आता यावर प्रशासन काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# ओबीसी मंत्रालयाचे तालुक्यात स्वतंत्र कार्यालये सुरू करा

**बागवान, अन्सारी, नालबंद, आतार, खाटीक, मुजावर, पिंजारी, तांबोळी समाजांची मागणी**

श्रीरामपूर/शफीक बागवान

ओबीसींचा (इतर मागास वर्गीय) विकास व त्यांच्या प्रश्नावर तातडीने कार्यवाही व्हावी या उद्देशाने ओबीसीं मंत्रालयाची स्थापना सरकारने केली. मात्र या विभागाचे अद्यापही तालुका स्तरावर कार्यालय नाही. त्यामुळे कामासाठी नागरिकांना जिल्हा ठिकाणी जावे लागते. त्यात वेळ आणि पैसा वाया जात असल्याने प्रत्येक तालुक्यात ओबीसीं मंत्रालयाचे स्वतंत्र कार्यालय सुरू करून त्याठिकाणी अधिकाऱ्याची नियुक्ती करावी, अशी मागणी ओबीसीच्या सर्व समाज पदाधिकऱ्यांनी केली आहे.

मुख्य मंत्री देवेंद्र फडणवीस तसेच पालक मंत्री राधाकृष्ण विखे, आमदार हेमंत ओगले यांना याबाबत पाठविण्यात आलेल्या ई- मेलद्वारा निवेदनात म्हटले आहे की, सन २०१६ मध्ये ओबीसींसाठी राज्य सरकारकडून स्वतंत्र ओबीसी मंत्रालयाची स्थापना केली गेली. भारतात प्रत्येक राज्यात स्वतंत्र ओबीसी मंत्रालयाचे कामकाज आपआपल्या मंत्रालयामध्ये स्वतंत्र विभाग देण्यात आले आहेत. महाराष्ट्र राज्यात देखील मंत्रालयामध्ये स्वतंत्र विभाग सुरू आहे. आजपर्यंत जिल्ह्यात तसेच तालुका स्तरावर या मंत्रालयाचे स्वतंत्र कार्यालय आणि अधिकाऱ्यांची नेमणूक झालेली नाही.

राज्यात ओबीसी ची लोकसंख्या मोठी आहे. प्रत्येक जिल्हा ठिकाणी समाजाचे मोठ्या प्रमाणात वास्तव्य आहे. त्यांची कामे ओबीसी मंत्रालयाकडून होतात. पण कामानिमित्त नेहमी जिल्हा ठिकाणी ये-जा करणे लोकांना आर्थिक दृष्ट्या परवडणे शक्य होत नाही.

नागरिकांच्या समस्या शासन दरबारी पोहोचवण्यासाठी स्वतंत्र कार्यालय आणि शासकीय अधिकाऱ्यांची नेमणूक होणे याठिकाणी आवश्यक आहे, अशी मागणी अकबरभाई बागवान, हाजी शफीक बागवान, हाजी नासीर बागवान, उस्मान तांबोळी, इब्राहीम कुरेशी, खिर्डी ग्रामपंचायतीचे सदस्य कंकर बागवान, मनसूर बागवान, अरुणोदय पतसंस्थेचे संचालक अकील बागवान, हाजी ख्वाजाभाई बागवान, हाजी कलीम भाई बागवान, आसिफ बागवान, रेहान बागवान, नजीरभाई मुलाणी, अबुभाई कुरेशी, जाफरभाई आतार, इब्राहीम मुजावर, अन्वर खाटीक, रिजवान बागवान, शफीक आतार, मोहम्मद तांबोळी, रमजान शाह, मेहबूब शाह, शकील काकर, साजिद मणियार, शाहरुख बागवान, शफीक आतार, शहेबाज रंगरेज, आसिफ बागवान, मोहसीन तांबोळी, असिफ पिंजारी, हुमायून अन्सारी, कय्युम नालबंद, अहमद रंगरेज, आदिनी केली आहे.

# खरीप हंगाम पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात संपन्न

नगर तालुका । प्रतिनिधी



येथील मौजे पोखर्डी (कराळे वस्ती), येथे मंगळवार ता. २० मे रोजी खरीप हंगाम पूर्व बैठक व प्रशिक्षण कार्यक्रम पार पडला. विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरात झालेल्या या कार्यक्रमाचे आयोजन कृषी विभाग, अहिल्यानगर यांच्यावतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाला जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, अहिल्यानगर सुधाकर बोराळे आणि तालुका कृषी अधिकारी, अहिल्यानगर विकास पाटील प्रमुख उपस्थित होते. त्यांनी शेतकऱ्यांना खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर विविध महत्वपूर्ण मोहिमाविषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात घरगुती पद्धतीने सोयाबीन बियाण्यांची उगवण क्षमता तपासणी चाचणीचे प्रात्यक्षिक घेण्यात आले.

यासोबतच बीज प्रक्रिया, माती परीक्षण मोहीम, जमीन आरोग्य पत्रिका यांची माहिती देण्यात आली. जमीन सुपीकता निर्देशांक आधारित खत व्यवस्थापन तसेच कृषी विषयक माहिती तंत्रज्ञानाच्या वापराचे महत्त्व शेतकऱ्यांना समजावून सांगण्यात आले. शेतकऱ्यांनी कृषी विभाग, अहिल्यानगर या अधिकृत व्हॉट्सअॅप चॅनलला फॉलो करावे, असे आवाहन अधिकाऱ्यांनी केले. कृषी आधारित व्यवसाय युनिट उभारणी संदर्भात माहिती देण्यात आली . तसेच हुमणी अळी नियंत्रणासाठी प्रकाश सापळा वापरण्याचे प्रात्यक्षिकही दाखवण्यात आले. कार्यक्रमास मंडळ कृषी अधिकारी, जेऊर माधवी घोरपडे, कृषी पर्यवेक्षक (जेऊर २), सतिश गोसावी ,कृषी सेवक सुरेखा घोंगडे, चैतन्य बडवे यांची उपस्थिती होती. याशिवाय पोखर्डी गावातील सुनील कराळे, विकास कराळे, बाबासाहेब विठोबा कराळे, भानुदास शंकर ठोंबरे आणि परिसरातील अनेक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम शेतकऱ्यांसाठी अत्यंत माहितीपूर्ण ठरला असून खरीप हंगामासाठी उपयोगी ठरणाऱ्या विविध बाबींचे प्रात्यक्षिक व मार्गदर्शन त्यांना मिळाले असून खरीप हंगामाच्या तयारीसाठी एक सकारात्मक पाऊल ठरले आहे.

# काकस्पर्श समितीचा प्रथम वर्धापनदिन साजरा

## दूतारे यांनी केला समिती सदस्यांचा सन्मान

श्रीगोंदा । माधव बनसुडे



धाकटी पंढरी म्हणून ओळख असलेल्या श्रीगोंदा शहरातील संतांच्या पावणभुमीत सिद्धेश्वर मंदिर या ठिकाणी सरस्वती नदीवर पुर्वी श्रीगोंदा तालुक्यातुन नागरिक या ठिकाणी दशक्रिया विधीसाठी येत होते मात्र काही अपवादात्मक कारणांमुळे पिंढीस कावळा शिवत नाही म्हणून श्रीगोंदा शहरांतील दशक्रिया विधीसाठी नागरीक सिद्धटेक व श्रीगोंदा कारखाना याठिकाणी जाणे पसंत करत होते. त्यामुळे या ठिकाणी होणारे दशक्रिया विधी बंद पडले होते.

मात्र अशोक आळेकर,बाळासाहेब खेतमाळीस, भाऊसाहेब खेतमाळीस, नाना शिंदे,नाना कोथींबीरे,शहाजी खेतमाळीस, यांच्या पुढाकाराने काकस्पर्श समिती स्थापन केली व गेल्या २० मे २०२४ पासुन रोज याठिकाणी दशक्रिया विधि सुरु केले त्या ठिकाणी दररोज कावळ्यांना सवय लागावी म्हणून रोज त्यांना खाण्यासाठी भेळ,भात अंडी टाकल्याने त्या ठिकाणी कावळे येण्यास सुरुवात झाली व वर्षभरात झालेल्या सुमारे १३५ दशक्रिया विधीस काकस्पर्श झाल्याने काकस्पर्श समितीच्या प्रयत्नांना यश आले.


२० में २०२५ रोजी १ वर्ष पुर्ण होत असल्याने प्रथम वर्धापन दिन साजरा करण्यात आला यामागचा उद्देश म्हणजे श्रीगोंदा शहरातील दशक्रिया विधी इतरत्र न नेता या ठिकाणीच व्हावेत कावळ्यांना सवय लागली आहे नागरिकांनाही लागावी व दशक्रिया विधी इतरत्र न नेता याच ठिकाणी व्हावेत व इतरत्र जाण्यासाठी होणारा खर्च टाळावा, व नागरिकांची गैरसोय होऊ नये असे काक स्पर्श समितीचे बाळासाहेब खेतमाळीस यांनी यावेळी सांगितले . यावेळी बाळासाहेब दुतारे शिवसेना यांनी काक स्पर्श समितीच्या सदस्यांना सन्मान चिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी कावळ्यांचे आभार मानुन दशक्रिया विधी झालेल्यांसाठी शांततेची प्रार्थना करण्यात आली. यावेळी काकस्पर्श समितीचे सदस्य, पत्रकार ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**प्रशासनाने व पोलीस स्टेशनने या ठिकाणी लक्ष घालून येथील स्वच्छतेकडे लक्ष देणे गरजेचे आहे. जेणेकरून येथील घाण कमी होईल. नागरिकांनीही दशक्रिया विधी झाल्यावर त्या ठिकाणी स्वच्छता केली पाहिजे.**

**ज्या ठिकाणी जन्म झाला त्याच ठिकाणी दशक्रिया विधी झाला पाहिजे. कावळा शिवो न शिवो जीवंतपणी आई वडीलांची सेवा करणे काळजी घेणे गरजेचे आहे.**
**– अशोक महाराज आळेकर**

# डॉ जयंत नारळीकर काळाच्या पडद्याआड

जगप्रसिद्ध खगोल – भौतिक शास्त्रज्ञ आणि विज्ञानकथा लेखक, पद्मविभूषण डॉ जयंत नारळीकर यांचे काल म्हणजे २० मे रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने बहुविध प्रतिभेचे धनी असलेले व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. डॉ जयंत नारळीकर यांचा जन्म १९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे कोल्हापूर येथे झाला. त्यांचे वडील रँग्लर विष्णू वासुदेव नारळीकर हे प्रसिद्ध गणीततज्ञ होते. ते वाराणसी येथील बनारस विश्व विद्यापीठाच्या गणित विभागाचे प्रमुख होते तर आई सुमती या संस्कृत विदुषी होत्या. वाराणसी येथे शालेय शिक्षण पूर्ण केलेल्या नारळीकर यांनी १९५७ साली विज्ञानाची पदवी प्राप्त केली. (बीएस्सी ) त्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी ब्रिटनमधील केम्ब्रिज येथे गेले. तिथे त्यांनी बीए,एमए आणि पीएचडी या पदव्या मिळवल्या. शिवाय रँग्लर आणि खगोल शास्त्राचे टायसन मेडल आणि इतर अनेक बक्षिसे मिळवली. त्यांचे पिएचडीचे गाईड डॉ फ्रेड हॉईल यांच्या साथीने त्यांनी स्थिर स्थिती सिद्धांतावर संशोधन केले व जगप्रसिद्ध बिग बँग सिद्धांताला आव्हान देणारा नवा सिद्धांत तयार केला. १९६६ साली नारळीकर यांचा विवाह मंगला राजवाडे ( गणितज्ञ ) ह्यांच्याशी झाला. त्यांना तीन मुली आहेत गीता, गिरिजा लीलावती. १९७२ साली ते मुंबईत परतले. तिथे त्यांनी टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या खगोलशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारली. १९८८ साली त्यांची पुणे येथील आयुका संस्थेचे संचालक म्हणून नियुक्ती झाली. डॉ जयंत नारळीकर यांनी पाच दशकांहून अधिक काळ खगोल आणि भौतिक शास्त्रात संशोधन केले. त्याच बरोबर सतत पुस्तके लिहिण्याचा कार्यक्रमही चालू ठेवला. डॉ जयंत नारळीकर हे रुढार्थाने साहित्यिक नसले तरी त्यांनी केलेले लेखन हे दर्जेदार साहित्यिकापेक्षा कमी दर्जाचे नाही. विज्ञानकथेसारखा वेगळा प्रवाह मराठी साहित्यात रुजविण्याचे मोठे काम त्यांनी केले. विज्ञानासारखा रुक्ष आणि अवघड विषय ललित साहित्याच्या अंगाने मांडून त्याला सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहचवण्याचे अवघड व महत्वाचे कार्य त्यांनी केले. त्यांनी केलेले विज्ञानविषयक लेखन व सुरस विज्ञान कथा यामुळे विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागली. खगोल शास्त्रात सातत्याने संशोधन करत असताना डॉ जयंत नारळीकरांनी लेखनही चालू ठेवले. त्यांनी अनेक विज्ञानकथा लिहिल्या. त्यांची यक्षाची देणगी, अंतराळवीर, भस्मासुर, टाइम मशीनची किमया, प्रेषित, अभयारण्य, याला जीवन ऐसे नाव, वामन परत आला, गणितातील गमतीजमती, नभात हसरे तारे, नव्या सहस्त्रकाचे नवे विज्ञान, विज्ञान आणि वैज्ञानिक, विज्ञानगंगेचे अवखळ वळणे, विज्ञानाची गरुडझेप, विज्ञानाचे रयचिते ही पुस्तके गाजली. त्यांनी लिहिलेले आकाशाशी जडले नाते व अंतराळ आणि विज्ञान ही पुस्तके प्रचंड गाजले. ही पुस्तके म्हणजे त्यांच्या दर्जेदार साहित्याचे उत्तम उदाहरण आहेत. तीन नगरातील माझे विश्व हे त्यांचे आत्मचरित्रही प्रसिध्द आहे. यक्षाची देणगी या त्यांच्या पहिल्याच पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला होता. सामान्य माणसाला खगोल शास्त्र समजवण्यासाठी त्यांनी अनेक वर्ष प्रयत्न केले. आपल्या लेखनातून त्यांनी अंधश्रद्धा दूर करण्याचाही प्रयत्न केला. बहुविध प्रतिभेचे धनी असलेले डॉ जयंत नारळीकर यांच्यासारख्या व्रतस्थ व्यक्तीमत्वास ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले हा त्यांच्या बहुविध प्रतिभेचा गौरव होता. डॉ जयंत नारळीकर यांच्यासारखे जेष्ठ विज्ञानविषयक लेखक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष बनल्यामुळे विज्ञान साहित्याला अधिकाधिक प्रतिष्ठा लाभली तसेच विज्ञानाचा प्रसार होण्यास व तरुण पिढीमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यास त्यांच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा खूप उपयोग झाला.





**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

**डॉ जयंत नारळीकर यांना भावपूर्ण श्रद्धाजली!**

# अप्पू हत्ती चौक ते सबलोक पेट्रोलपंप रस्त्यास क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे मार्ग नाव द्या

## सत्यशोधक बहुजन आघाडीची ठराव मंजूर करण्याची प्रशासक डांगे यांच्याकडे मागणी

**अहमदनगर । प्रतिनिधी**

सत्यशोधक बहुजन आघाडी यांनी नगरकरांच्यावतीने ता.२० मे रोजी मनपा प्रशासक तथा आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे पत्र देत मागणी केली आहे की, अप्पू हत्ती चौक ते सबलोक पेट्रोलपंप रस्त्यास क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे मार्ग नाव देण्याचा ठराव येत्या सभेत घेवून मंजूर करावा. दिलेल्या मागणीपत्रात म्हटले आहे की, या रस्त्यास पुर्वी कोणतेही नाव दिलेले नाही, तसा ठराव नाही. तसेच या रस्त्यास नामफलक लावून वरील नाव देण्याचा जाहीर कार्यक्रम करावा. अधिक माहिती देताना सांगितले की, क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे हे महाराष्ट्रातील एक थोर समाजसुधारक, क्रांतिकारक आणि शूर मल्लविद्या प्रशिक्षक होते. ते विशेषतः दलित समाजातून आलेले पहिले क्रांतिकारक म्हणून ओळखले जातात. त्यांच्या कार्याने पुढील पिढ्यांना प्रेरणा दिली, विशेषतः महात्मा फुले, सावित्रीबाई फुले आणि इतर समाजसुधारक यांना. त्यांचे मल्लविद्येचा प्रसार व प्रशिक्षण. लहुजी वस्ताद साळवे हे कुस्तीचे (मल्लविद्या) नामवंत शिक्षक होते. त्यांच्या आखाड्यातून



**नाव देण्याचा ठराव करण्यासाठी आमदारांना भेटा असा निरोप आयुक्त यशवंत डांगेंनी दिला असता, ठराव मंजूर करून नाव देण्याचे कर्तव्य आपले आहे, अशी आठवण शिष्टमंडळाने करून दिली.**

अनेक शूर युवक घडले. त्यांनी स्वतः वासुदेव बळवंत फडके यांना लढाईची प्रशिक्षण दिले, ज्यांनी पुढे सशस्त्र क्रांतीचा मार्ग स्वीकारला. समाजसुधारणा व समतेसाठी संघर्ष दलित समाजातील असमानता, अस्पृश्यता आणि शिक्षणापासून वंचित ठेवणे याविरोधात लहुजी वस्ताद साळवे यांनी आवाज उठवला. त्यांनी पुण्यातील तरुणांमध्ये सामाजिक जागृती निर्माण केली. महात्मा फुल्यांचे सहकारीमहात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीला त्यांनी मोलाचे पाठबळ दिले. स्त्रीशिक्षण, शूद्र-अतिशूद्रांच्या हक्कांसाठी ते नेहमी

फुल्यांच्या पाठीशी उभे राहिले. स्वातंत्र्य संग्रामाशी नाते ब्रिटिश सत्तेविरुद्ध संघर्ष करणाऱ्या चळवळींना त्यांनी प्रोत्साहन दिले. त्यांनी शस्त्रास्त्रांची आणि युद्धकलेची प्रशिक्षण देऊन अनेक क्रांतिकारक घडवले. लहुजी वस्ताद हे पहिले क्रांतिकारक होते, ज्यांनी दलित समाजात सामाजिक आणि राजकीय जागृती केली. त्यांनी ''सर्वांना शिक्षण'', ''समान संधी'' यासाठी आवाज उठवला, जो नंतर अनेक चळवळींचा पाया ठरला. त्यांचे आखाडे हे केवळ कुस्तीचे प्रशिक्षण देणारे नव्हते, तर ते सामाजिक विचारांचे केंद्र होते.फ पुण्यातील विविध भागांत त्यांचे स्मारक आणि पुतळे उभारले गेले आहेत. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागातर्फे दरवर्षी त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ विविध कार्यक्रम होतात. अनेक समाजसुधारक त्यांना 'पहिले दलित क्रांतिकारक' व 'समतेचे प्रणेते' मानतात. आपल्या मुलांसाठी, विद्यार्थ्यांसाठी आणि समाजासाठी लहुजी वस्ताद साळवे यांचे जीवन आदर्श आहे. त्यांनी ज्या प्रकारे शिक्षण, समानता आणि स्वाभिमानासाठी झगडले, ते आजही प्रेरणादायी आहे. म्हणून त्यांचे नाव देणे आपले कर्तव्य आहे. तरी आपण या नावाचा ठराव मंजूर करावा. शिष्टमंडळामधे संदिप सकट (जिल्हाध्यक्ष), सुनिलभाऊ ढोले (शहराध्यक्ष), शाम वैराळ (शहर उपाध्यक्ष), जालिंदर शेलार (शहर कार्याध्यक्ष), योगेश साबळे (शहर सचिव), महेशभाऊ सकट (खजिनदार), अजय काते (शहराध्यक्ष, सांस्कृती आघाडी), राहुल ठोकळ (शहर संघटक), रुपेश जगधने (प्रसिध्दी प्रमुख), सुरेश सकट (सहसचिव), किशोर पवार आदींचा समावेश होता.

# सहजयोग ध्यानसाधनेमुळे आत्मिक शांतता लाभते– जगताप

## प. पु. माताजी श्री निर्मला देवी यांचा मेघा पब्लिक प्रोग्राम संपन्न





**अहमदनगर । प्रतिनिधी**

प. पु. माताजी श्री निर्मला देवी यांच्या परम कृपेत जॉगिंग ट्रॅक मैदान सावेडी येथील सहजयोग ध्यान साधनेची माहिती व कुंडीलिनी शक्ती जागृतीच्या कार्यक्रम प्रसंगी महाराष्ट्र राज्य सहजयोग प्रचार प्रसार टीम चे प्रचारक प्रा. नितीन पवार, मा. जि. प. सदस्य सचिन जगताप, मा. महापौर बाबासाहेब वाकळे,मा. सभापती सचिन जाधव, नगरसेवक अजिंक्य बोरकर, डॉ. सागर बोरुडे, अमोल यावलकर, मेजर कुंडलिक ढाकणे, रावसाहेब भोपळे , कोकरे साहेब, ताजणे साहेब, दैनिक ध्येय, बीड चे उपसंपादक उमा चव्हाण, अमित बुरा व मा. जिल्हा समन्वयक श्रीनिवास बोज्जा आदी उपस्थित होते. या वेळी बोलतांना सचिन जगताप म्हणाले आजच्या ताण तणावाच्या दुनियेत ध्यान साधनेची प्रत्येकाला फार गरज आहे. सहजयोग ध्यान साधना ही आंतरराष्ट्रीय स्तरावर असून ही ध्यान साधना नियमित केल्यामुळे आंतरिक शांती मिळते याचा अनुभव मी घेतलेला असून प्रत्येकाने सहजयोग ध्यान साधना अंगीकारावी असे आवाहन केले.कार्यक्रमाचे सुरुवातीस अमरावती येथील आंतरराष्ट्रीय संगीतकार संदीप दलाल व मिलिंद दलाल यांनी आपल्या संगीताने उपस्थितांना मंत्र मुग्ध केले. आलेल्या सर्व पाहुण्यांचे व उपस्थित सर्व साधकांचे अहिल्यानगर सहजयोग परिवाराचे वतीने मा. जिल्हा समन्वयक श्रीनिवास बोज्जा यांनी स्वागत केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अशोक तरकसे यांनी केले. कार्यक्रमाची माहिती देतांना प्रा. नितीन पवार म्हणाले सहजयोग ध्यान साधनेचा फायदा लहान मुलापासून तरुण व वयोवृद्धा पर्यंत सर्वांना होतो.

हा योग कुटुंबातील सर्वांनी एकत्रित बसून करता येणारा योग आहे, या ध्यान साधनेमुळे प्रत्येक मानवाला सुखी व आनंदी जीवन जगता येते. आज भारतासह जगातील १४० देशापेक्षा जास्त देशातील नागरिकांनी सहजयोग ध्यान साधना प्राप्त केली असून त्या ठीकाणी आज पावेतो विनसायास ध्यान साधना चालू आहे. कार्यक्रमाची सुरुवात भव्य रॅली ने करण्यात आली असून या रॅली मध्येदोन लाईटिंग केलेले रथ,चार घोडे, दोन उंट, मोठे बँड पथक हलगीवाले, ट्रॅक्टर ट्रॉली व या मध्ये वेशभूषा केलेले श्री गणेशजी, हनुमान जी, श्री सिताराम, श्री शिव पार्वती, लक्ष्मण, महालक्ष्मी महासरस्वती, महाकाली, भारत माता घोड्यावरती स्वार झालेले श्री छत्रपती शिवाजी महाराज, झाशीची राणी, अहिल्याबाई होळकर व माँ जिजाऊ असे असंख्य पात्र पोशाखात उभे होते. या रॅली चे विशेष आकर्षण म्हणजे अहिल्यानगर येथील सहजयोगी महिलांनी अनेक दिवस परिश्रम करून जो लेझीमचा डाव बसवला तो अप्रतिम होता या लेझीम डाव साठी शुभम भालदंड सर यांनी अथक परिश्रम घेतले. रॅली मध्ये मशाल धरणारे जेष्ठ सहजयोगी, श्रीमाताजींची प्रतीमा ठेवलेले रथ तसेच माताजींच्या चरणाची पालखी असे मोठया प्रमाणात सहजयोगी संपूर्ण महाराष्ट्रातून उपस्थित होते. कार्यक्रमाचे ठिकाणी भव्य एल ई डी स्टेज वर होता तर साधकांसाठी दोन्ही बाजूला दोन एल ई डी लावण्यात आले होते, स्टेज वर सिंहासनावर प. पु. माताजींची मोठी प्रतिमा होती. संपूर्ण मैदानात प्रचंड प्रकाश होता अशा या संपूर्ण मेगा पब्लिक प्रोग्राम चे आयोजन मोहोळ, सोलापूर येथील अमोल यावलकर, नाशिक येथील सुमित अहिरे, लोणी येथील अमोल अभंग, संगमनेर येथील मनोज वाकचौरे यांच्या सह अहिल्यानगर येथील वसंत गायकवाड सर, उत्तम बेरड, चंद्रकांत रोहोकले,विनायक जोग, पंतम काका, संदीप गांगर्डे, शुभम,नितीन देवळालकर, गजेंद्र सांगळे, मनोज बोज्जा, मनोहर म्याना,अविनाश आडेप, लक्ष्मण अंदे, गणेश कोडम, अशोक कराळे, राजू मंचे, राजू द्यावनपेल्ली, रवींद्र आगरकर, मनोज चव्हाण, बालाजी मेरगू, विशाल संभार, कार्तिक ढाकणे, अथर्व बोज्जा, धनंजय ढाकणे, अमर बुरा तसेच स्त्री शक्ती म्हणून जयश्री सामलेटी, वीणा बोज्जा, किरण येनगंदुल, सुनीता शिदे, सुलभा सोलट, वासंती वैद्य सह अनेक महिलांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुमित अहिरे यांनी केले तर शेवटी आभार अमित बुरा यांनी मानले.

# निगडी प्राधिकरणातील हरित सेतू प्रकल्प रद्द करण्यासाठी भूमिका घ्या!

## सामाजिक कार्यकर्ते बाळा शिंदे यांचे खासदार आणि आमदारांना साकडे

**पिंपरी । प्रदीप गांधलीकर**

पिंपरी – चिंचवड महापालिकेच्या वतीने प्रशासकीय काळात अनेक अनावश्यक व भविष्यात शहरातील लोकांना त्रासदायक ठरतील असे प्रकल्प राबविण्याचा व लोकांचा विरोध डावलून ते रेटून नेण्याचा प्रयत्न केला जात आहे. निगडी प्राधिकरणातील पेठ क्रमांक २४, २५, २६, २७ आणि २८ या भागात महापालिका हरित सेतू प्रकल्प राबवणार आहे. पर्यावरणपूरक वातावरण तयार करण्याची स्वप्ने दाखवली जात आहेत. मात्र हा प्रकल्प भविष्यात त्रासदायक ठरणार आहे. त्यामुळे लोककल्याण लक्षात घेऊन हा प्रकल्प रद्द करण्यासाठी आपण योग्य ती भूमिका घ्यावी, अशी विनंती पिंपरी – चिंचवड भाजपचे शहर उपाध्यक्ष चंद्रकांत उर्फ बाळा शिंदे यांनी खासदार श्रीरंग बारणे, महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्यासह विधानपरिषद आमदार उमा खापरे आणि अमित गोरखे यांना पत्र देऊन केली आहे. महापालिकेच्या वतीने निगडी प्राधिकरणात हरित सेतू प्रकल्प राबविण्यात येणार असून या प्रकल्पास बाळा शिंदे यांनी विरोध दर्शविला आहे. या संदर्भात त्यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना पत्र देऊन हा प्रकल्प रद्द करण्याची विनंती केली आहे; तसेच प्रकल्प रद्द न केल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे. याच प्रकरणाचा पाठपुरावा करत आता बाळा शिंदे यांनी हरित सेतू प्रकल्प रद्द करण्यासाठी भूमिका घ्यावी, असे साकडे खासदार श्रीरंग बारणे, महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, आमदार उमा खापरे, अमित गोरखे यांना घातले आहे. हरित सेतू प्रकल्पाद्वारे प्राधिकरणातील प्रशस्त व सुव्यवस्थित असलेले रस्ते छोटे करून पदपथ मोठे करण्याचा उद्योग सुरू आहे. त्यामुळे भविष्यात वाहतूककोंडी होऊन हवेचे प्रदूषण वाढणार आहे. या प्रकल्पांतर्गत सायकल ट्रॅकची केलेली घोषणाही फसवी आहे; कारण याआधी पिंपळे सौदागर भागात पिंपरी – चिंचवड महापालिकेने सुरू केलेला सायकल शेअरिंग प्रकल्प गुंडाळण्याची वेळ आली आहे. हरित सेतू प्रकल्पाच्या नावाखाली झालेले चुकीचे काम दुरुस्त करण्यासाठी भविष्यात पदपथ आणि सायकल ट्रॅक काढून टाकण्याची वेळ येणार हे निश्चित आहे. यात महापालिकेच्या आणि पर्यायाने करदात्या नागरिकांच्या पैशांची लूट होणार आहे. या प्रकल्पामुळे भविष्यात निर्माण होणारे प्रश्न लक्षात घेता हरित सेतू प्रकल्प रद्द करावा अशी प्राधिकरणातील समस्त नागरिकांची मागणी आहे. आपण एक लोकप्रिय लोकप्रतिनिधी आहात. जनतेच्या प्रश्नांची आपल्याला जाण आहे. राष्ट्रहित आणि लोककल्याण लक्षात घेऊन हा प्रकल्प रद्द करण्यासाठी आपण योग्य ती भूमिका घेऊन प्रशासनास याबाबत योग्य ते आदेश द्यावेत, अशी विनंती चंद्रकांत उर्फ बाळा शिंदे यांनी या पत्रात केली आहे. आता हे लोकप्रतिनिधी बाळा शिंदे यांच्या पत्रानंतर काय भूमिका घेतात याकडे समस्त प्राधिकरणवासीयांचे लक्ष लागले आहे. प्राधिकरणातील हरित सेतू प्रकल्प रद्द झाल्यास पुणे – मुंबई महामार्गावर महापालिकेने मुख्य रस्ते छोटे करून पदपथ मोठे करण्याचा आरंभलेला उद्योगसुद्धा गुंडाळावा लागणार आहे.



# ना. भुजबळ यांच्या कॅबिनेट मंत्रिपदी निवडीचे जल्लोषात स्वागत

**अहमदनगर । राजू खरपुडे**

समता परिषदेचे संस्थापक आणि ओबीसी नेते नामदार छगन भुजबळ यांची कॅबिनेट मंत्री म्हणून निवड झाल्याबद्दल अहिल्यानगर, माळीवाडा येथील महात्मा फुले यांच्या पुतळ्याजवळ समता परिषद व सकल ओबीसी समाज समन्वय समितीच्या वतीने जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी पेढे वाटून व फटाके फोडून कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला. यावेळी समता परिषदेचे पशचिम विभागीय अध्यक्ष अंबादास गारुडकर, सरचिटणीस अनिल निकम, जि.प. सदस्य शरद झोडगे, माजी महापौर भगवान फुलसौंदर, बाळासाहेब बोराटे, प्रा. संजय गारुडकर, जालिंदर बोरुडे, सदाशिव घाडगे, कैलास हराळे, रामदास फुले, राहुल हजारे, जाधव, मंगल भुजबळ, राजू पडोळे, अमोल घाडगे, बजरंग भुतारे, जाधव, विजय बेलेकर, अंबादास पुंड, भास्कर चौधरी, अर्जुन बोरुडे, भाऊसाहेब पुंड यांच्यासह समता परिषदेचे कार्यकर्ते आणि ओबीसी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना पशचिम विभागीय अध्यक्ष अंबादास गारुडकर यांनी म्हणाले की, नामदार छगनराव भुजबळ यांची मंत्रिमंडळात झालेली नियुक्ती ही केवळ ओबीसी समाजाची नव्हे, तर सर्वसामान्य जनतेसाठी अभिमानास्पद बाब आहे. त्यांच्या दीर्घ राजकीय अनुभवाचा फायदा राज्याला निश्चितच होणार आहे. समता परिषदेच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक न्यायासाठी दिलेला लढा आता मंत्रिपदाच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे पुढे नेला जाईल. सरचिटणीस अनिल निकम यांनी आपल्या भाषणात सांगितले की, भुजबळ साहेब हे नेहमीच सर्वसामान्यांच्या हक्कासाठी लढत आले आहेत. त्यांची ही निवड म्हणजे सामाजिक समतेच्या चळवळीला नवे बळ मिळण्याची सुरूवात आहे. समता परिषद व ओबीसी समाज हा भुजबळ साहेबांच्या विचारांची प्रेरणा घेऊन समाजहितासाठी काम करत राहील.

